**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. १६५/२०१२</u>**

**<u>नि. ८२ खालील आदेश</u>**

अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सदरचा अर्ज वादीने बक्षिसपत्राबाबत पुन्हा साक्षीदार तपासण्याची परवानगी मिळण्याकरीता दिलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन की, वादीला बक्षिसपत्राबाबत साक्षीदार तपासायचे असून तोंडी पुरावा दयावयचा आहे. परंतु, वादीने त्याचा पुरावा बंद केलेला आहे. बक्षिसपत्राबाबतचे साक्षीदार तपासले न गेल्यास वादीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीला दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी बक्षिसपत्रावरील साक्षीदार तपासण्याची परवानगी देण्यात यावी अशी मागणी केली आहे. प्रतिवादीने त्याचे म्हणणे (नि.८३) देवून अर्जाला सक्त हरकत घेतली आहे. त्यांनी म्हणण्यामध्ये वादीने सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे. वादीने यापूर्वी नि. ७९ कडे अशाच प्रकारचा अर्ज दिला होता. पुन्हा तशाच प्रकारची मागणी प्रस्तुतच्या अर्जाने केली आहे. त्यामुळे अशा प्रकारचे दोन अर्ज वादीला देता येणार नाही. वादीने दाव्यात अंतिम युक्तीवाद झाल्यानंतर सदरचा अर्ज दिलेला आहे. त्यामुळे वादीला अशा प्रकारचा अर्ज देता येणार नाही व पुन्हा पुरावा देण्याची परवानगी मागता येणार नाही. वादीने नि. ३५कडील आदेशाप्रमाणे दुय्यम पुरावा देण्याबाबत आवश्यक ती तजवीज केलेली नाही. वादीचा पुरावा वादीने पुरशिसने बंद केलेला नसून तो न्यायालयाचे आदेशाने बंद झालेला आहे. वादीला बक्षिसपत्राबाबत दावा दाखल केल्यापासून माहिती होती. परंतु, त्याबाबत त्याने आधी पुरावा दिलेला नाही व प्रतिवादीचा पुरावा संपल्यानंतर सदरच्या अर्जाने तो ती परवानगी मागत आहे. यावरून केवळ वादी हे दाव्याचे कामकाजात विलंब आणीत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अर्ज कायदेशीर नसल्यामुळे तो नामंजुर करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

३. सदरचा दावा हा सन २०१२ सालातील असून दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी दोघांचाही पुरावा संपल्यानंतर व दाव्यात अंतिम युक्तीवाद झाल्यानंतर सदरचा अर्ज वादीने दिलेला आहे. वादीने सदरच्या दाव्यामध्ये त्यांना संधी देवूनही पुरावा न दिल्यामुळे दिनांक १६/०४/२०१६ रोजी वादीचा पुरावा बंद करण्यात आला आहे. त्यानंतर दाव्यात प्रतिवादीने पुरावा दिलेला आहे. त्यानंतर प्रतिवादीने नि. ६७ चा अर्ज दिल्यानंतर दाव्यात दिनांक ३०/१०/२०१७ रोजी अतिरिक्त मुद्दे काढण्यात आले. त्यानंतर वादीने पुरशिस (नि.७१) देवून त्यांना पुरावा दयायचा नाही असे नमुद केले आहे. त्यामुळे वादीने स्वत:हून एकदा आपला पुरावा बंद केल्यानंतर पुन्हा प्रस्तुतच्या अर्जाने त्यांना पुरावा देण्याची ते परवानगी मागत आहेत असे त्यावरून दिसते.

४. दावा पहाता सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरूध्द वाटप होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीने त्याच्या दाव्यामध्ये दावा मिळकत ही वादी व प्रतिवादीचे वडील महादेव गिरी यांनी दिनांक २८/०६/१९८३ रोजीच्या बक्षिसपत्राने वादी व प्रतिवादी यांना बक्षिस म्हणून दिलेली आहे. त्यामुळे दावा मिळकतीत प्रतिवादीबरोबर वादीचासुध्दा सामाईक मालकी कब्जाभोग्य आहे. म्हणजेच वादी हा दाव्यात बक्षिसपत्रावर संपूर्णत: अवलंबून आहे. परंतु तरीही वादीने दाव्यात बक्षिसपत्र दाखल करून त्यातील मजकूर त्या बक्षिसपत्रावरील साक्षीदार तपासून शाबित करून घेतलेला नाही व प्रस्तुतच्या अर्जाने ते बक्षिसपत्र शाबित करून घेण्याचा प्रयत्न करीत आहे असे दिसते. यापूर्वी नि. ३५ कडे मुळ बक्षिसपत्र हे प्रतिवादीच्या ताब्यात असून प्रतिवादी क्र. १ यांस मुळ बक्षिसपत्राबाबत जरूर ते आदेश व्हावे अशी मागणी केली होती. त्या अर्जावर वादीला प्रतिवादी याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १२ नियम ८ नुसार नोटीस पाठवावी असे निर्देश दिले होते. परंतु वादीने तशा प्रकारची नोटीस प्रतिवादीला पाठवली याबाबतचा पुरावा दाव्यात दाखल केला नाही व

दाव्यात नि. ७६ सोबत दिनांक २८/०६/१९८३ रोजीचे बक्षिसपत्राची सहिशिक्क्याची नक्कल दाखल केली आहे व सदरच्या सहिशिक्क्याच्या नक्कलेतील मजकूर शाबित करण्यासाठी त्यावरील साक्षीदारांना या दाव्यात साक्षीदार म्हणून तपासण्याची परवानगी प्रस्तुतच्या अर्जाने वादीने मागितली आहे.

५. सर्व प्रथम वादीने दिनांक २८/०६/१९८३ चे मुळ बक्षिसपत्र दाव्यात दाखल केलेले नसून नि. ७६ सोबत वादीने दिनांक २८/०६/१९८३ रोजीच्या बिक्षिसपत्राची सहिशिक्क्याची नक्कल दाखल केली आहे. सदरची नक्कल ही भारतीय पुरावा कायदयानुसार दुय्यम पुरावा आहे असे दिसते. वादीचे विधिज्ञांनी दाखल केलेल्या **मा. उच्च न्यायालय, मुंबई** यांचेकडील **परसनबाई धनराज जैन व. वि. सुनंदा मधुकर जाधव {२०१७(६)ऑल एमआर ८७७}** या न्यायनिवाडयामध्ये **मा. उच्च न्यायालय, मुंबई** यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

" I will say so briefly once again : either secondary evidence is led or it is not led. Either no provisions of Section 65 are met or they are not met. No permission of a Court is required to lead evidence evidence of any kind. No judge in the subordinate judiciary to this High Court will hereafter will insist on any such application under any circumstances whatsoever. I do not think I can put it in any clearer terms than this. Any such order is wholly illegal and liable to be set aside. A copy of this order is now to be circulated to every Civil Judge in the State of Maharashtra. To clarify: in an evidence affidavit under Order 18, a witness may well say of a given document that he can not prove it by direct evidence and then proceed to adduce the secondary evidence in compliance with Section 65 of the Evidence Act. The Trial Court is to consider that evidence, viz., the reason given for not leading direct evidence, and the secondary evidence led, and is to then decide whether the secondary evidence led is sufficient. That is all. There is absolutely no question of an application, whether styled as an interim application or a ' MARJI' application, for 'permission' to lead secondary evidence. The Court cannot refuse that permission, and it cannot insist on an application for any such permission."

सदर न्यायनिवाडयानुसार दुय्यम पुरावा म्हणून कागद पुराव्यात वाचण्यासाठी परवानगी घेण्याची आवश्यकता नसते असे नमुद केलेले आहे. त्यामुळे बक्षीसपत्राची सहिशिक्क्याची नक्कल असुन ती दुय्यम पुरावा आहे. त्यामुळे ती पुराव्यात वाचण्याची परवानगी घेण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

६. वादीने प्रस्तुतच्या अर्जाने केवळ त्यास बक्षिसपत्राबाबत साक्षीदारांचा पुरावा घेण्याची परवानगी मिळावी अशी मागणी केली आहे. वादीला बक्षिसपत्रातील मजकूर शाबित करण्यासाठी त्या बक्षिसपत्रावरील साक्षीदारांचा पुरावा देवून तो मजकूर शाबित करण्यासाठी त्यांची साक्ष घेणे आवश्यक आहे याबाबत दुमत नाही. परंतु वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दावा अंतिम युक्तीवादासाठी असताना दिलेला आहे ही बाब अतिशय महत्वाची आहे. सदरचा दावा हा वर नमुद केल्याप्रमाणे वाटपासाठी दाखल केला असून तो संपूर्णत: बक्षिसपत्रावर अवलंबून आहे. म्हणजेच वादीचा दावा मिळकतीत हिस्सा आहे की नाही हे संपूर्णपणे बक्षिसपत्रावरून ठरणार

आहे. त्यामुळे तो दाव्यात महत्वाचा पुरावा आहे. वादीला जर दाव्यात बक्षिसपत्र शाबित करण्याची संधी दिली नाही तर वादीला त्याची बाजु व्यवस्थित मांडता येणार नाही व त्यामुळे त्याचा दावा मिळकतीत हिस्सा आहे की नाही हे त्याला शाबित करता येणार नाही. दावा मिळकतीत वादीचा हिस्सा आहे की नाही याबाबत दाव्याचा न्यायनिर्णय देण्याकरीता बक्षिसपत्राचा पुरावासुध्दा दाव्यात येणे आवश्यक आहे. बक्षिसपत्राबाबतच पुरावा दाव्यात आल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय देण्यास सोयीस्कर होणार आहे. दावा युक्तीवादाच्या टप्प्यात असताना वादीने सदरचा अर्ज दिला म्हणून त्यास परवानगी नाकारली तर वादीला त्याची बाजु व्यवस्थित शाबित करता येणार नाही व त्यामुळे वादीचे पैशाच्या स्वरूपात भरून येणार नाही असे नुकसान होणार आहे. त्यामुळे केवळ उशीराने वादीने प्रस्तुतचा अर्ज दिला म्हणून तो नाकारणे न्यायोचित दिसून येत नाही. याउलट वादीला उशीर झाला म्हणून खर्चाच्या माध्यमातून शासन करणे न्यायोचित वाटते. सबब वरील बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर केला.

२. वादीने प्रतिवादीला रूपये ३०००/— (रूपये तीन हजार मात्र) खर्च देण्याच्या अटीवर वादीला बक्षिसपत्राबाबत पुरावा देण्याची संधी देण्यात येत आहे.

**सही/—**
(एम्. एस्. बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.

दिनांक :— ०५/०७/२०१८.